# ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा (सुभेदारवाडा), कल्याण (प.)

## * अहवाल सन २०१२-१३ *

जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूटची प्राथमिक शाळा, सुभेदारवाडा, गांधी चौक, कल्याण आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

* जून १९८५ साली जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूटची प्राथमिक शाळा कल्याण मधील सुभेदारवाड्यात सुरू झाली. सध्या शाळेच्या प्राथमिक विभागात १६ वर्ग असून ९६३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेत एक मुख्याध्यापिका, १६ शिक्षिका, १ लेखनिक व १ सेविका कार्यरत आहे. तसेच संस्था पातळीवर १ संगीत शिक्षिका ५ सेविका कार्यरत आहेत. त्यामुळे शाळेचे शैक्षणिक नियोजन व्यवस्थित होते.

* सन २०१२-२०१३ चे शैक्षणिक वर्ष १३ जून २०१२ पासून सुरू झाले. इ. १ ली ते इ. ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके देण्यात आली.

* आपल्या शाळेत यावर्षीपासून इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण दिले जात आहे.

* इ. १ ली चे दोन वर्ग व इ. २ री चे दोन वर्ग सेमी इंग्लिशचे घेण्यात येत आहे.

* शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शैलजा मोडक या शासन नियमानुसार ३० सप्टेंबर २०१२ ला सेवानिवृत्त झाल्या.

* शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. प्रज्ञा मोने यांनी १ ऑक्टोबर २०१२ पासून मुख्याध्यापक पदाचा पदभार स्वीकारला.

* एम. पी. एस (इ. ३ री) परीक्षेचा निकाल ९९% लागला.
कल्याण केंद्रातून खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.
१) कु. अमृता मोडक - प्रथम, २) कु. पियुष हुलवळे - तिसरा, ३) कु. शंतनू वाबळे - चौथा,
४) कु. गौरीष वझे- पाचवा, ५) कु. रितिकेश आल्हाटे - सहावा, ६) कु. निखिल बागुल - सातवा
या विद्यार्थ्यांना सौ. पोतदार, सौ. वंडेकर, सौ. प्रभाळकर या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

* पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल १००% लागला. असून ११ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली.
१) कु. कृतिका अरज - ६ वी, २) कु. सुयोग कांबळे - ९ वा, ३) कु. प्रतिक वाणी - १२ वा, ४) कु. आदिती जोशी- १३ वी, ५) कु. साहिल तडवी - १४ वा, ६) कु. सानिका जोग- १५ वी, ७) कु. धनराज रिसबूड- १७ वा, ८) कु. अवनी कुलकर्णी - १९ वी, ९) कु. स्वामीनी चौधरी - १९ वी, १०) कु. शुभम जाधव - २० वा
११) कु. अथर्व नेने -२१ वा
या विद्यार्थ्यांना सौ. प्रज्ञा मोने, सौ. नेहा कुलकर्णी, सौ. प्रमिला राठोड, सौ. ज्योती पाटील या शिक्षकांनी मार्गदर्शन केले. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा १००% निकाल लागणाऱ्या शाळेला संस्थेतर्फे दिली जाणारी "कै. सुशांत वैद्य शिष्यवृत्ती ढाल" सलग दुसऱ्या वर्षीही आपल्या शाळेला मिळाली.

* मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे.
गणित परीक्षा- इ. ३ री. १००%, इ. ४ थी- १००%
इंग्रजी परीक्षा - इ. ३ री - १००%, इ. ४ थी - १००%
याच परीक्षांमध्ये कु. सानिका जोग या विद्यार्थिनीने गणित व इंग्रजी दोन्ही विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून महाराष्ट्र राज्यात प्रथम येण्याचा मान मिळविला.

* जूनमध्ये एम. पी. एस. व स्कॉलरशिप परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा घेण्यात आली.

* जुलैमध्ये इ. १ ली ते इ. ४ थी च्या पालकांची पालकसभा घेण्यात आली.

* दि. ६ ऑगस्ट व ७ ऑगस्ट प्रथम घटक चाचणी घेण्यात आली.

* दि. २२ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर पर्यंत प्रथम सत्र परीक्षा घेण्यात आली.

❊ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली अनेक शैक्षणिक उपक्रम व स्पर्धा घेण्यात येतात.

❊ जानेवारी २०१२ मध्ये 'गल्ली ते दिल्ली' या विषयात ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, विधानसभा, संविधान या घटकांवर रंजकपणे प्रतिकृती व तक्ते स्वरूपात मांडणी करून शैक्षणिक प्रदर्शन भरविण्यात आले.

❊ शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावे म्हणून विविध सण, उत्सव साजरे केले जातात. दीपपूजा, गुरूपौर्णिमा, रक्षाबंधन, श्रावणातले सण, दहीहंडी, भोंडला, मकरसंक्रांत तसेच विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राभिमान जागृत होण्यासाठी स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन साजरा करतात. थोर नेत्यांच्या जयंती व पुण्यतिथीचे कार्यक्रम विविध उपक्रम व स्पर्धा घेऊन साजरे केले जातात.

❊ सावित्रीबाई फुले जयंतीचा दिवस 'बालिका दिन' म्हणून साजरा केला. त्यादिवशी मुलींची रंगभरण स्पर्धा घेण्यात आली.

❊ लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त इ. १ ली ते इ. ४ थीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या बौद्धिक स्पर्धा घेण्यात आल्या.

❊ २ ऑक्टोबरला इ. ४ थी चे विद्यार्थी व पालकांसमवेत गांधी जयंती गांधीचौकात साजरी करण्यात आली. तसेच लालबहादूर शास्त्री जयंती साजरी केली. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व लालबहादूरशास्त्री जयंती साजरी केली. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची माहिती सांगितली.

❊ गांधी जयंतीचे औचित्य साधून शिक्षक पालक संघातर्फे शाळेच्या माजी मुख्याध्यापिका श्रीमती शैलजा मोडक यांचा निरोप समारंभ साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. सुरेंद्र बाजपेईसर होते.

❊ जानेवारी २०१२ मध्ये शिक्षक पालक यांची सहल 'युसुफ मेहेर अली सेंटर कर्नाळा' येथे नेण्यात आली. तेथे श्री. उदय वैद्य यांचे 'बालकांचा सर्वांगीण विकास-पालकांचा सहभाग' यावर व्याख्यान आयोजित केले होते.

❊ शिक्षक पालक संघातर्फे 'सुजाण पालकत्व' यावर श्री. वैद्य यांनी व्याख्यान दिले.

❊ जुलै २०१२ मध्ये शिक्षक पालकांसाठी श्री. उन्मेष गद्रे यांनी 'स्वयंमूल्यमापन व शिक्षक पालकांच्या शैक्षणिक समस्या' यावर व्याख्यान तसेच 'बालक पालक-परस्पर संबंध' यावर उद्‌बोधक मार्गदर्शन केले.

❊ शिक्षक पालक संघातर्फे इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या.

❊ ५ सप्टेंबर शिक्षकदिनानिमित्त 'विद्यार्थी झाले शिक्षक' हा कार्यक्रम घेण्यात आला त्यात इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, शिक्षक, सेवक इ. भूमिका बजावल्या.

शिक्षकदिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेत खालील शिक्षकांना बक्षिसे मिळाली.

प्रथम क्रमांक - सौ. सुलभा थोरात, द्वितीय - चारूशिला वंडेकर, तृतीय- सौ. दिपा राक्षे, उत्तेजनार्थ विभागून - सौ. प्रमिला राठोड, सौ. प्रियंका मराठे

❊ संत राममारुती पुण्यतिथी उत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांनी अथर्वशीर्षाचे पठण केले.

❊ २०११-१२ संस्थेतर्फे कै. गुरूवर्य श्री. ज. बापट स्मृती वकृत्व स्पर्धेत कु. कस्तुरी नेने हिने प्रथम क्रमांक तर कु. साक्षी रानडे हिने द्वितीय क्रमांक मिळविला.

❊ २०१२-१३ संस्थेतर्फे कै. गुरूवर्य श्री. ज. बापट स्मृति वकृत्व स्पर्धेत कु. साक्षी रानडे हिने प्रथम क्रमांक मिळविला.

❊ संस्थेतर्फे झालेल्या आंतरशालेय नाट्यस्पर्धेत शाळेने सादर केलेल्या ''आम्ही हरलोय - पृथ्वी जिंकलीय'' या नाटकास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक शाळेतील शिक्षिका सौ. प्रज्ञा भोने, सौ. ज्योती पवार, सौ. स्वाती शेंडे यांना मिळाले तर उत्कृष्ठ अभिनयाचे पारितोषिक कु. साक्षी रानडे हिला मिळाले.

❊ सन २०११-१२ क. डों. म. पा. तर्फे घेण्यात आलेल्या समूहगान स्पर्धेत शाळेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले या गीताचे संगीत संयोजन सौ. शमिका खटावकर यांनी केले.

❊ संस्थेतर्फे घेण्यात येणाऱ्या कै. जावडेकर निबंध लेखन स्पर्धेत शाळेतील शिक्षिका सौ. प्रियंका मराठे यांना

द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.
* कै. प. वि. भातखंडे पुरस्कृत २०१२ आदर्श शिक्षक पुरस्कार शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. प्रज्ञा मोने यांना प्राप्त झाला. हा पुरस्कार संस्थेतर्फे दिला जातो.
* इनरव्हिल क्लब ऑफ इंडिया कल्याण यांच्यातर्फे २०११-१२ मध्ये आंतरशालेय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या.
चमचा लिंबू स्पर्धेत - कु. मानसी बांडे - प्रथम क्रमांक
स्मरणशक्ती - कु. शुभम गीते - द्वितीय क्रमांक
रिलेस्पर्धेला द्वितीय क्रमांक मिळाला. या स्पर्धेत मानसी बांडे, प्रणित जोखर, मानसी पाटील, प्रणय महाजन हे विद्यार्थी सहभागी होते.
* संस्कृती कलादर्पणतर्फे घेण्यात आलेल्या गीतगायन स्पर्धेत संगीत शिक्षिका सौ. खटावकर यांना द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले तर कु. साक्षी रानडे हिला एकपात्री अभिनयाचे द्वितीय व वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. लावणीनृत्यात कु. सिमरन पिंपळे व धनश्री गोखले यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.
* शारदामंदिर संस्थेतर्फे उषाताई कुलकर्णी स्मृतिदिनानिमित्त घेण्यात आलेल्या २०११-१२ यावर्षात कथाकथन स्पर्धेत कु. उमा वैद्य हिला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले तर २०१२-१३ मध्ये याच स्पर्धेत कु. साक्षी जोशी हिला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.
* अथर्व ट्रस्ट डोंबिवलीतर्फे घेण्यात आलेल्या २०११-१२ या वर्षात हस्ताक्षर स्पर्धेत कु. सानिका जोग जिल्ह्यात दुसरी आली.
*** कलारत्न पुरस्कार भेटकार्ड स्पर्धेत कु. कल्पिता बिऱ्हाडे राज्यात तिसरी कलागौरव पुरस्कार तसेच अनेक विद्यार्थ्यांनी कलाविष्कार पारितोषिक मिळवले. श्रीमती शैलजा मोडक यांना कलाभूषण पुरस्कार सौ. पल्लवी गोखले,** सौ. ज्योती पवार या शिक्षकांना कलाश्री कला टिचर पुरस्काराने सन्मानित केले. हीच स्पर्धा २०१२-१३ मध्ये घेण्यात आली. त्यात खालील पारितोषिके प्राप्त झाली.
* रंगभरण स्पर्धेत कु. स्नेहा पाटील राज्यात प्रथम आली तिला कलागौरव पुरस्कार मिळाला.
* कु. सुमित भादले याला कलारत्न पुरस्कार मिळवून जिल्ह्यात दुसरा आला. हस्ताक्षर स्पर्धेत कु. दिव्या वझे राज्यात आली. कु. आसावरी नागपुरे चित्रकला स्पर्धेत राज्यात आली. कु. अर्पिता पैठणकर हिने कलारत्न पुरस्कारात जिल्ह्यात दुसरा क्रमांक पटकाविला. तसेच सौ. नेहा कुलकर्णी, स्वाती शेंडे या शिक्षकांना कलाभूषण पुरस्कार मिळाला.
* शाळेला आदर्श विद्यालयाचा पुरस्कार प्राप्त झाला.
* चिन्मय मिशन गीतापठण स्पर्धा घेण्यात आली त्यात कु. उमा वैद्य, कु. साक्षी रानडे यांनी यश संपादन केले.
* क. डों. म. पा. आयोजित बालमहोत्सवात खालील पारितोषिके प्राप्त झाली.
समूहगान - प्रथम क्रमांक रु.३०००/- चषक व प्रमाणपत्र या गीताचे संयोजन सौ. शमिका खटावकर व सौ. मनिषा धोपटकर या शिक्षकांनी केले. इ. ३ री चे विद्यार्थी सहभागी होते.
बालनाट्य - "आम्ही हरलोय - पृथ्वी जिंकलीय" प्रथम क्रमांक रुपये ६०००/- चषक व प्रमाणपत्र
उत्कृष्ट दिग्दर्शन - प्रथम क्रमांक रु. १०००/-चषक व प्रमाणपत्र
सर्वोत्कृष्ट नेपथ्य - तृतीय क्रमांक रु. ५००/-चषक व प्रमाणपत्र
नाटकाचे दिग्दर्शन सौ. स्वाती शेंडे, सौ. ज्योती पवार या शिक्षकांनी केले तर नाटकाचे नेपथ्य मुख्याध्यापिका सौ. प्रज्ञा मोने यांनी केले.
सर्वोत्कृष्ट अभिनय मुली - कु. साक्षी रानडे- प्रथम क्रमांक रु. १०००/- चषक व प्रमाणपत्र
कु. उमा वैद्य उत्तेजनार्थ चषक प्रमाणपत्र
सर्वोत्कृष्ट अभिनय मुलगे - कु. गौरिष वझे, कु. शंतनू वाबळे यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.
न्यायिक लढा पत्रकार सेवासंस्थातर्फे झालेल्या स्पर्धांना खालील बक्षिसे मिळाली.

कथालेखन स्पर्धा - कु. मधुरा ओक - प्रथम क्रमांक, हस्ताक्षर स्पर्धा - कु. वेदश्री इनामदार - उत्तेजनार्थ
रंगभरण स्पर्धा - कु. साई ओम ठाकूरदास - उत्तेजनार्थ

✻ सकाळ बालमित्र चित्रकला स्पर्धा २०११-१२ मधील विजयी विद्यार्थी - प्रथम क्रमांक - कु. साक्षी रानडे, तृतीय क्रमांक - कु. गार्गी कर्वे, उत्तेजनार्थ - कु. श्वेता घोडके, कु. समीर इरनक, कु. साक्षी गायकवाड

✻ लोकमत जंगलबुक स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळाले.

✻ नवनीत चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. त्यात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्रमाणपत्र मिळविले.

✻ लोकमत ओशनबुक चित्र चिटकविणे स्पर्धेत अनेक विद्यार्थी सहभागी झाले. कु. शुभम दराडे या विद्यार्थ्याला प्रथम क्रमांक मिळाला तसेच इतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

✻ ठाणे जिल्हा सब ज्युनिअर व ज्युनिअर तायक्कांडो चॅम्पियनशिप स्पर्धेत १६ किलो वजनी गटात कु. मधुरा ओक हिला सुवर्णपदक प्राप्त झाले.

✻ राज्यपातळीवर कराटे स्पर्धेत कु. आदित्य आव्हाड याला सिल्व्हर पदक प्राप्त झाले. कु. दिव्यांशू पाटील राज्यस्तरावर, राष्ट्रीयस्तरावर कराटेसाठी खेळतो.

✻ विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक यांचे शाळेतर्फे हार्दिक अभिनंदन!

✻ आदर्शगाव कसे असते हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी इ. ३ री, इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांची अभ्यासविषयक सहल राष्ट्रपती पुरस्कृत आदर्शगाव महाळुंगे येथे जुलै महिन्यात नेण्यात आली.

✻ इ. १ ली व २ री च्या विद्यार्थ्यांना मनसोक्त मातीत खेळता यावे तसेच आजूबाजूचा परिसर न्याहाळता यावा म्हणून पडघा येथील 'पुष्करमेळा' या ठिकाणी २२ डिसेंबरला सहल नेण्यात आली.

✻ विद्यार्थ्यांना इतिहासाबद्दल जिज्ञासा व निसर्ग जवळून न्याहाळता यावा म्हणून इ. ३ री व इ. ४ थी च्या वर्गाची निवासी सहल सिंहगड, पुणे येथे आयोजित केली आहे.

✻ क. डों. म. पा. शिक्षण मंडळ आयोजित विज्ञान प्रदर्शनात शाळेतील शिक्षिका सौ. स्वाती शेंडे, सौ. चारूशिला वंडेकर यांनी नैसर्गिक संसाधने आणि पर्यावरण यातील 'रेनवॉटर हार्वेस्टिंग' हा प्रकल्प सादर केला.

✻ दि. १५ जानेवारी २०१३ ते १८ जानेवारी २०१३ शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

✻ शाळेचे वाचनालय असून वाचनालयात शिक्षक पालक व विद्यार्थी यांच्यासाठी सुमारे २००० चांगली पुस्तके असून ज्या पालकांना त्याचा लाभ घ्यावयाचा आहे. रु. १००/- अनामत रक्कम देऊन सभासद व्हावे. सभासदांनी दर शनिवारी १० ते १२ या वेळेत पुस्तके बदलण्यासाठी प्राथमिक ऑफिसमध्ये यावे.

✻ पालक आपल्या पाल्याच्या वाढदिवसानिमित्त ११ रुपयांपासून २०१ रुपयांपर्यंत देणगी देतात. त्या देणगीतून शाळेला आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य घेतले जाते.

✻ शाळेवरील प्रेमापोटी काही हितचिंतक, माजी पालक यांनी शाळेला इलेक्ट्रिक पंखे भेट दिले.

✻ सरकारी नियमानुसार होणाऱ्या विविध प्रशिक्षणांना मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित राहतात.

अशाप्रकारे आपल्या विशाल वटवृक्षाला समृद्धी व यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी संस्था व शिक्षक सतत प्रयत्न करीत असतात त्यास यश मिळो हीच प्रार्थना!

धन्यवाद!

**सौ. प्रज्ञा प्रमोद मोने**
मुख्याध्यापिका,
ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा(सुभेदारवाडा)

संकलन :- सौ. ज्योती अरुण पाटील
(साहाय्यक शिक्षिका)

१३७/